आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२५ मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, २२ जूनपासून पावसाळी अधिवेशन

- अजित पवार यांच्या अपघात प्रकरणी घातपात आढळून आला तर दोषींना शिक्षा करण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं विधानसभेत आश्वासन

- अशोक खरात प्रकरणानंतर अंधश्रद्धा निर्मुलन कायदा आणखी कडक करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विधानपरिषदेत संकेत

- सुधारित उडान योजनेच्या अंतर्गत १०० विमानतळ विकसित करायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

आणि

- युद्धविरामाच्या संदर्भातला अमेरिकेचा प्रस्ताव प्राप्त झाल्याची इराणची माहिती

**<><><><><>**

राज्य विधानसभेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून मुंबईत सुरू होणार असल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. या अधिवेशनात २० दिवस कामकाज झालं. त्यात २२ विधेयकं मंजूर झाली.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी सीआयडीकडून तपास योग्य दिशेनं सुरू आहा. यात काही घातपात आढळून आला तर कोणत्याही परिस्थितीत जबाबदार असणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. ते आज विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना बोलत होते.

या प्रकरणात एफ आय आर नोंदवणं शक्य नाही, जेव्हा पूर्ण चौकशी होईल आणि यात घातपात असल्याचं निष्पन्न झालं तर एडीआरचंच रुपांतर एफ आय आर मधे होईल असं ते म्हणाले. कर्नाटकात या प्रकरणी दाखल झालेला झिरो एफ आय आर बेकायदेशीर असल्याचं ते म्हणाले.

कांद्याचा प्रश्न सोडवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता असून सध्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाच्या सचिवांची समिती स्थापन करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवला आहे. मात्र मंडळ नसली तरी विदर्भ आणि मराठवाड्याला गरजेपेक्षा जास्त निधी वितरित केला जातो असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

भोंदू अशोक खरात प्रकरण हे संतापजनक, माणुसकीला काळिमा फासणारच  आहे, अशा भोंदूबाबांना शिक्षा करण्यासाठी कायदा आणखी मजबूत करायची गरज पडली, तर तो करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विरोधी पक्षांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला ते उत्तर देत होते. विरोधी पक्षांनी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणं अपेक्षित असतं, पण ते दिसून आलं नाही. विरोधी पक्ष निष्प्रभ आणि गलितगात्र असल्याची टीका त्यांनी केली. हे शेतकऱ्यांचं सरकार आहे. राज्याच्या तिजोरीवर सगळ्यात पहिला अधिकार बळीराजाचा आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेदरम्यान मांडलेले मुद्दे ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून

- **- होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(एकनाथ शिंदे नवी दिल्ली दौऱ्यावर होती त्याच दिवशी अशोक खरात प्रकरण उघडकीला आलं. या प्रकरणाचा उपयोग राजकारणासाठीच होणार आहे असून यात कुणाचं नाव गोवायचं हे ठरवलं जाईल असा दावा नाना पटोले यांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या दरम्यान बोलताना विधानसभेत केला. खरातचा कोठडीत मृत्यू होण्याची भीती असून त्याला चोवीस तास कॅमेऱ्याच्या निगराणीत ठेवावं अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली.*

*उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी एफ आय आर दाखल व्हावा अशी मागणी जयंत पाटील यांनी केली. अवकाळी पावसामुळे झालेलं नुकसान, नदी शुद्धीकरण मोहिमेचं अपयश, कंत्राटदारांच्या बिलाची थकबाकी इत्यादी मुद्दे त्यांनी उपस्थित केले. सरकारी शाळांमध्ये शाळांमध्ये सोयीसुविधा पुरवण्याची मागणी नितीन राऊत यांनी केली.*

*राज्यात आज जर मंत्रीच संरक्षण मागत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांनी काय करायचं, असा सवाल अनिल परब यांनी विधानपरिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात करताना उपस्थित केला. राज्यात अंमली पदार्थांचा वाढता विळखा, महिला सुरक्षा, बालकांवरचे अत्याचार, डिजिटल फसवणूक, डिजिटल अटक, अशोक खरात प्रकरण, पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकावर टीकास्त्र सोडलं.*

*दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची चर्चा लावावी अशी विनंती वारंवार करूनही ती झाली नाही, यावर शशिकांत शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली.*

*सरकारचं काम अतिशय पारदर्शी पद्धतीनं सुरू आहे, अशी ग्वाही प्रवीण दरेकर यांनी दिली. पोलीस, सफाई कामगार, गिरणी कामगारांसाठी सरकार करत असलेल्या कामांचा उल्लेख त्यांनी केला.*

*विधानसभेतून कौस्तुभ पटाईतसह अंकिता आपटे विधानपरिषद मुंबई )*

**<><><><><>**

आगामी दहा वर्षांच्या कालावधीत सुधारित उडान योजना राबवण्यासाठी आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या योजनेसाठी एकूण २८ हजार ८४० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नवी दिल्ली इथे मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

- **- - होल्ड अश्विनी वैष्णव - - -**

- **<><><><><>**

पाइप गॅस सुविधा उपलब्ध असलेल्या विभागांमध्ये एलपीजी पुरवठा बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पीएनजी सुविधा उपलब्ध असूनही एलपीजीवर अवलंबून राहणाऱ्या ग्राहकांना ३ महिन्यात पीएनजीची जोडणी घ्यावी लागेल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं काल प्रसिद्ध केलेल्या दिशानिर्देशात म्हटलं आहे.

पाइप गॅस जोडणी देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसेल तर पुरवठादाराकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यावर एलपीजी जोडणी कायम ठेवता येईल, असं या निर्देशात स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ होणार असल्याची अफवा पसरली असून प्रत्यक्षात दरांमध्ये वाढ झालेली नाही, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं.

गेल्या २५ दिवसांत सुमारे अडीच लाख नवीन पीएनजी जोडण्या देण्यात आल्या असून २ लाख २० हजार ग्राहकांनी एलपीजीऐवजी पीएनजी वापरण्याचा निर्णय घेतल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><>

रेस्टॉरंटमध्ये येणाऱ्या ग्राहकांवर एलपीजी शुल्क, इंधन दरवाढ शुल्क न लादण्याचा इशारा केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं सर्व हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांना दिला आहे. अशा प्रकारचं अयोग्य शुल्क लादणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं प्राधिकरणानं म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं आज संसद भवन संकुलात सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, जेडीयूचे कार्याध्यक्ष संजय झा आणि राजीव रंजन सिंह यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

या बैठकीत काँग्रेस नेते मुकुल वासनिक आणि तारिक अन्वर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जॉन ब्रिटास, समाजवादी पार्टीचे धर्मेंद्र यादव यांच्यासह विरोधी पक्षांचे इतर नेतेही उपस्थित होते.

<><><><><>

मध्य पूर्वेतलं युद्ध थांबवण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव इराणला मिळाल्याचा दावा इराणी अधिकाऱ्यांनी केला आहे. मात्र, अद्याप याविषयीची कुठलीही अधिकृत माहिती इराण सरकारने दिलेली नाही. हा प्रस्ताव १५ कलमांचा असून त्यात निर्बंध शिथिल करणं, अणुकार्यक्रम मागे घेणं, क्षेपणास्त्रांवर मर्यादा घालणं तसंच होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करणं अशा अटींचा त्यात समावेश आहे.

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराणमध्ये शांतता प्रस्तावाविषयी कुठलीही चर्चा झाली नसल्याचं इस्लामाबादमधले इराणचे राजदूत रझा अमिरी मोघदम यांनी स्पष्ट केलं आहे. सध्याचं युद्ध हे अमेरिकेनं केलेल्या विश्वासघाताचा परिणाम आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये, माओवादी संघटनेचा एक प्रमुख नेता पापा राव याच्यासह १८ माओवाद्यांनी आज आत्मसमर्पण केलं. त्यात सात महिलांचा समावेश आहे. पापा राव हा माओवादी संघटनेच्या राज्य विभागीय समितीचा सदस्य असून त्याच्यावर २५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

**<><><><><>**

वर्ष २ हजार २५ च्या सरस्वती सम्मान पुरस्कारासाठी लेखक रामकुमार मुखोपाध्याय यांची बंगाली कथा “हर पार्बती “याची निवड झाली आहे. हा पुरस्कार के के बिर्ला फौंडेशन कडून दिला जातो. १५ लाख रुपये, मानपत्र आणि मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**//<><><><><>//**